कला अकादमी गोवा
पणजी–गोवा
कअ/हिंसंवि/२०२५–२६/१९३९
दि. २०/०२/२६

# कृपया प्रसिध्दीसाठी

कला अकादमी गोवा येथील हिंदुस्तानी संगीत व नृत्य विभागातर्फे दि. १७ फेब्रुवारी २०२६ रोजी पहिल्यांदाच "कला संवाद" अंतर्गत ओडिसी नृत्यशैलीवरील व्याख्यान–प्रात्यक्षिक उत्साहात पार पडले. या सत्रात गुरु केलुचरण महापात्रा यांच्या शिष्या, सुप्रसिध्द ओडिसी नृत्यांगना सौ. पूर्णिमा कार्तिक, यांनी ओडिसी नृत्याची शास्त्रीय रचना, तांत्रिक वैशिष्टये व आध्यात्मिक आशय प्रभावीपणे उलगडून दाखवले.

कार्यक्रमाची सुरुवातीला दीपप्रज्वलन सोहळा ओडिसी नृत्यांगना पूर्णिमा कार्तिक व त्यांच्या दोन शिष्यांसह, कला अकादमीच्या संचालिका डॉ.सपना नाईक, हार्मोनियम विभागाचे प्राध्यापक श्री. सुभाष फातरर्पेकर तसेच इतर प्राध्यापकांच्या उपस्थितीत पार पडला. प्रास्ताविक डॉ. सपना नाईक यांनी केले. त्यानंतर महारी व गोटीपुआ परंपरेतून विकसित झालेली ओडिसी नृत्यशैली, ब्रिटिश काळात या कलेवर झालेले परिणाम, तसेच संयुक्ता पाणिग्रही यांच्यामुळे ओडिसीला मिळालेली जागतिक ओळख यांचा त्यांनी संदर्भासह उल्लेख केला. ओडिसीतील समभंग अभंग, त्रिभंग व चौक हे चार मूलभूत अंगभंग तसेच मंगळाचरण ते मोक्ष हा मार्गमचा प्रवास त्यांनी प्रात्यक्षिकातून स्पष्ट केला.

समारोपाला सादर झालेल्या माणिक्यवीणा मंगळाचरणाने सभागृह भक्तिरसाने भारावून गेले. त्यानंतर झालेल्या संवादात्मक सत्रात विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सौ. वरदा बेडेकर यांनी केले व सौ. मंदीरा तिरोडकर यांनी आभार प्रदर्शनाने कार्यक्रमाची सांगता झाली. ओडिसी नृत्याला केवळ पाहण्यापेक्षा समजून घेण्याची दृष्टी देणारा असा हा उपक्रम यशस्वीरित्या पार पडला.

हिंदुस्थानी संगीत व नृत्य विभाग
कला अकादमी गोवा

प्रति

१.गोमंतक २.नवप्रभा ३.तरुण भारत ४.पुढारी ५.लोकमत ६.दै.हेराल्ड

७.गोवन वार्ता, ८. दै भांगरभूंय ९.आकाशवाणी पणजी केंद्र( वृत्तविभाग)